# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

**प्रेसनोट** दिनांक:- २७/१०/२०१८

## सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिना निमित्ताने ग्रामीण पोलीस दलातर्फे जिल्हयात राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन

---

स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री, लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिना निमित्ताने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी **ग्रामीण पोलीस दलातर्फे** जिल्हयात **''राष्ट्रीय एकता दौड''** चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय एकात्मता व जातीय सलोखा वृध्दींगत व्हावा यासाठी ग्रामीण पोलीस दलातील पोलीस ठाणेनिहाय तालुकास्तर तसेच ओझर, पिंपळगाव व मनमाड अशा एकुण १८ ठिकाणांवर सदर राष्ट्रीय एकात्मता दौड आयोजित केली आहे. यासाठी ग्रामीण पोलीस दलाकडुन जोरदार तयारी करण्यात येत आहे. ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ०६:०० वाजे पासुन सदर एकात्मता दौडला सुरूवात होणार असुन पोलीस ठाणेनिहाय शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, प्रशासकिय सेवेतील अधिकारी व कर्मचारी, गावातील सर्वसामान्य नागरीक, राजकिय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मिडीया प्रतिनिधी व वार्ताहर, समाजसेवक तसेच सर्व जाती-धर्मियांनी एकत्र येवुन सदर राष्ट्रीय एकता दौडमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे. विविध गटात वयोमानानुसार सदर स्पर्धा पार पडणार आहे.

सदर राष्ट्रीय एकात्मता दौड मध्ये सहभाग घेण्यासाठी जास्तीत जास्त नागरीकांनी नजीकचे **पोलीस ठाणेस जाऊन मोफत नोंदणी करावी** असे आवाहन **मा.पोलीस अधीक्षक श्री संजय दराडे सो** यांनी केले आहे. सदर स्पर्धेत सहभाग नोंदविणारे प्रत्येक नागरीक/शालेय विद्यार्थ्यांना ग्रामीण पोलीस दलातर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. मॅरेथॉन मार्गावर सर्व धर्मियांच्या योगदानातुन स्टॉलस् उभारण्यात येणार असुन धावपट्टूंसाठी प्राथमिक उपचार केंद्र, सुसज्ज ॲम्ब्युलन्स सुविधा तैनात करण्यात येणार आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंतीनिमित्ताने संपुर्ण भारत देशात राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात येणार आहे, त्याअनुषंगाने जिल्हा पोलीस दलातर्फे राष्ट्राची एकता, अखंडता व सुरक्षा आबाधित राखण्यासाठी, तसेच एकात्मतेचा संदेश ग्रामीण भागातील प्रत्येक नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी **''रन फॉर युनिटी - चला आपण सर्व धावुया'' असा संदेश ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी दिला आहे.

राष्ट्रीय एकात्मता ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यात युवावर्गाची भुमिका महत्वाची आहे, पोलीस दलातील वरिष्ठ अधिका-यांचे मार्गदर्शनानुसार युवावर्गास प्रोत्साहन करण्यात येणार आहे. सोशल मिडीयाचा वाढता प्रभाव पाहता लहान मुलांना मैदानाकडे वळविणे ही नैतिक जबाबदारी मानुन जास्तीत जास्त युवा वर्गाने सदर राष्ट्रीय एकता दौड मध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहनही ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.